# Matrumandir-Devrukh

# Dedicated
# Covid Health center (DCHC)

Daily

# Bulletin

20.05.21

संपर्क : - SMS हॉस्पिटल
7798241390 / 02354260026

# Matrumandir
# Dedicated Covid Health Center

## Daily Patient Update

**20.05.21**

| | Total Capacity | Total Occupancy | Available Beds |
|---|---|---|---|
| Total Beds | 30 | 11 | 19 |
| With O2 | 8 | 0 | 8 |
| Without O2 | 13 | 2 | 11 |
| Icu beds | 9 | 9 | 0 |
| Ventilators | 0 | 0 | 0 |

# THANK YOU

**ओंजळीत मावेल एवढंच भरावं,**
**आणि सांडण्या अगोदर वाटायला शिकावं!!**

या घोषवाक्यांने सुरवात होणारा "स्नेह परिवार" हा अशोक वायकुळ ॲडमिन असणारा एक वॉटसप ग्रुप आज सामाजिक कार्यातील सोशलमिडीयाच्या सकारात्मक कार्याचा आदर्श मानदंड ठरत आहे.

देशांतील करोनाच्या महाभयंकर दुसर्या लाटेने कोकणच्या ग्रामीण भागातील वाड्या वस्तीवर घुसखोरी केली आणि ॲाक्सीजन आणि बेड अभावी मरणासन्न अस्वस्थतेच्या थराराने संगमेश्वर ग्रामीण भाग भयभीत झाला. अशा आणीबाणी प्रसंगी मातृमंदिर देवरुख हॉस्पिटलने कोविड केअर सेंटर सुरु करत जे धाडसी पाऊस उचलले त्याला पहिली मदतीची साद दिली ती अशोकदादा वायकुळ यांनी.

आपणापाशी असून फक्त चालत नाही, ते देण्याची एक मानसिकता लागते. तो अशोकदादांचा स्थायी भाव आहे. आणि हे संस्कार त्यांनी आपल्या मुले- सुना या सार्या कुटुंबात असे काही समरसून दिले की पहिल्या देणगीचे मानकरी दादांचे सारे वायकुळ कुटुंबच ! त्याच्या या दानशूरत्वाला सलाम!

अशोकदादा आणि माझा परिचय तसा फार जूना, माझ्या वडीलांपासूनचा, आमचे भाई जॉर्ज फर्नांडीस यांचे प्रचंड चाहते तर अशोकदादा फर्नान्डीसांचे राईट हॅन्ड. मातृमंदिरच्या निवडणूक ते मातृमंदिरसाठी निधी गोळा करण्यासाठी अशोकदादा सदैव आघाडीवर. मुंबईत ते मला आणि आत्माराम मेस्त्रीला घेऊन अनेकांकडे जात आणि पैसे मिळवून देत .

अशोकदादांचा स्नेह परिवार मात्र भन्नाट आहे. त्याचा वैचारीक , सामाजिक सास्कृतिक विस्तार फारच व्यापक आहे, अगदी परिघा पलिकडचा. या परिवारात अनेक दिग्गज आहेत डॉक्टर, प्राध्यापक, साहित्यिक, उद्योजक, कृषि, पर्यटन आणि विविध सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा यात समावेश आहे. पर्यटन, उद्योग , कारखाने, सामाजिक संस्था ते हेमलकसा येथील आदिवासी विद्यार्थ्यांना कोकण दर्शन असे विविध उपक्रम ते घेत असतात. अनेक कर्तृत्ववान व्यक्तिमत्वांची ओळख करुन देत असतात.

सामाजिक भान आणि सामाजिक जाणिवा अधिक प्रगल्भ करणारा असा हा वॅाटसप ग्रुप मातृमंदिरच्या कोविड केअर सेंटर साठी सहकार्य करण्याचे त्यांनी ठरविले आणि एक आश्चर्य वास्तवात अवतरले. यांतील एक गंमतीशीर भाग आहे तो सर्वसामान्यांच्या सहभागाचा. मावशी ( इंदिराबाई) हळबे यांनी १९५४,साली फक्त दोन कॅाटने सुरु केलेले मातृमंदिर हॅास्पिटल हे लोकसहभागातून वाढले . त्यामुळेच देवरुख परिसरातील १०० गावांतील लोकांना ते आपले वाटते या प्रत्येकाची नाळ येथे जोडली गेली आहे, हाच दुवा स्नेह परिवाराने अचूक जोडला.

अगदी २०० रुपया पासून आपआपल्या शक्यतेनुसार झालेले योगदान हे फार महत्वाचे आणि मोलाचे. अशोकदादांनी स्नेह परिवारातर्फे संकल्प ३ लाखाचा केला होता. त्यासाठी गेले १५ दिवस त्यांची प्रचंड धडपड सुरु होती. त्यांच्या या संकल्पाला आज जेष्ठ उद्योजक रामकृष्ण कोळवणकर यांनी एक लाख रुपयांची देणगी देत चार चांद लगावले.

स्नेह परिवाराने सामाजिक बांधिलकीचा आणि मेडियाच्या संपर्क यंत्रणा शक्तिचा नवा मापदंडच आदर्श म्हणून दिला आहे. स्नेह परिवाराच्या या आर्थिक योगदाना बरोबरच त्यातील कल्पकता, संकल्पना, संघटन, समुपदेशन आणि सामाजिक उपक्रमातील योगदान हे सदैव प्रेरणादायी आहे. स्नेह परिवार आणि आपणा सार्यांचे मातृमंदिर परिवारात स्नेहमय स्वागत आहे.

रत्नागिरी जिल्ह्यात ट्रस्ट संस्थात्मक आरोग्य सुविधेची उपलब्धता नाही आणि मातृमंदिर देवरुख हे मध्यवर्ती ठिकाण याचा विचार करुन येत्या काळात सुपरमल्टीस्पेशालीटी रुग्णालयाचा भव्य प्रकल्प नियोजित आहे.
मात्र सध्य परिस्थितीत येणार्या तिसर्या लाटेचा विचार करुन लहान मुलांसाठी स्वतंत्र अद्ययावत कोविड कक्ष उभारण्याचे तातडीचे नियोजन आहे. आपला स्नेह सदैव मातृमंदिर सोबत रहावा ही विनंती

अभिजित हेगशेटये
मातृमंदिर, देवरुख

THANK YOU



# हे हि घडतंय ..

**योग्य औषधोपचार व प्रबळ इच्छाशक्तीच्या जोरावर करोनामुक्त झालेल्या सावंत आज्जी.**

चंद्रभागा सावंत मावशींना दम लागायला लागला आणि तपासणी करता करोना पॉझीटिव्ह आढळल्या. कुटुंबीयांनी पुढील उपचारासाठी जवळच असणाऱ्या ‘मातृमंदिर- डेडिकेटेड कोविड हेल्थ सेंटर’ मध्ये दाखल केले. पण सावंत आजींनी मात्र उपचाराना ठाम विरोध केला, संपूर्ण असहकार. शेवटी शेवटचा पर्याय म्हणून कुटुंबियांच्या संमतीने सहाय्यकांनी अगदी बांधून उपचार सुरु केले.

आपल्या सेंटर मध्ये आल्या तेव्हा ऑक्सिजन लेवल व RTPCR स्कोर अत्यंत धोकादायक स्थितीत होते. पण डॉ.प्रकाश पाटील व त्यांच्या सहकार्यांनी योग्य उपचार करत आजींना यशस्वीपणे करोनामुक्त केले.

**“आजींचे वय आणि अत्यंत खालावलेली स्थिती यातून आज्जी ज्या पद्धतीने रिकव्हर झाल्या, हे आपल्या सर्वांसाठी एक आश्वासक उदाहरण आहे”** असं डॉ.प्रकाश पाटील सांगतात.

आज आजी फॉलोअप साठी आल्या होत्या. त्यांना गमतीने विचारलं ‘आजी राहता २ दिवस ?’ यावर आजी छान हसल्या. कुटुंबीयांनी सांगितलं सुरुवातीला इतका त्रास देवूनही इथल्या स्टाफने तिला चांगल्या प्रकारे सांभाळली, त्यामुळे इथून निघताना मात्र एकदम शांत होती, आणि सर्वात महत्वाचे म्हणजे खूप खुश होती.

**सर्व स्टाफला सॅल्युट.**



We Proud of You

# ऑल राऊंडर गणेश

गणेश अत्यंत शांतपणे पण खूप महत्वाची कामे सहज हातावेगळी करताना दिसतो. पण यामागे आहे त्याचा या क्षेत्रातला दांडगा अनुभव. वालावलकर हॉस्पिटलसारख्या महत्वाच्या हॉस्पिटलला 8 वर्ष अनुभव घेतल्यानंतर आत गणेश आपल्याच गावात आला. मागील वर्षभर अकौंटंट म्हणून अत्यंत महत्वाची जबाबदारी तो उत्तम प्रकारे पार पडतोय.

करोना सेंटर मध्ये काम करताना भीती वाटत नाही असं विचारल्यावर आलेलं गणेशच उत्तर आपल्यालाही अंतर्मुख करतं. गणेश म्हणाला 'भीती असली तरी कुणीतरी करायलाच हवं ना. अर्थात इथे काम करतानाच गणेशलाही करोना झाला होता. पण लक्षणं दिसल्यावर वेळीच उपचार सुरु करून सुखरूप बाहेर आला. सर्व प्रकारच्या कामांचा अनुभव असल्यामुळे व वेळेला अगदी अम्ब्युलंसहि चालवू शकणारा गणेश सर्वांना हवा असतो.

रुग्णांच्या बिलाबद्दल नातेवाईकांच्या प्रतिक्रिया विचारल्यावर गणेश मातृमंदिरचा वारसा नेमकेपणाने मांडतो. 'इथं दिल जाणारे सवलतीतील उपचार, औषधे, अम्ब्युलंस आदी सेवा, मोफत जेवण यावर पेशंट खूप समाधानी दिसतात' आणि ते खुश दिसले कि मलाही समाधान वाटत.' गणेश मनापासून सांगतो. गणेशच्या स्वभावातील शांतपणा हा या समाधानाचंच प्रतिबिंब असावं.

**Front Desk Warriors**

# Front Desk Warriors

## उत्साही अनामिका

सुरुवातीला मी जायचो तेव्हा हि मुलगी लगबगीने सर्व कामे करताना दिसायची. तिच्या कामातली सहजता आणि आत्मविश्वास पाहून बरेच वर्ष काम करत असावी असं वाटल. पण मला तीच कौतुक वाटलं जेव्हा तीला एकच महिना झालाय इथे असं कळल.

आपापल्या विवंचनेत असलेल्या पेशंटच्या नातेवाईकांना अनामिकाच पहिली सामोरी जाते. इथले अनेक प्रकारचे रिपोर्ट्स निरनिराळ्या ठिकाणी दिवसातून ठरलेल्या वेळी पाठवतानाच डॉक्टर,नर्स,वॉर्डबॉय, पेशंटचे नातेवाईक अशा सगळ्यांकडून अनेक गोष्टींचा मारा होत असताना ते लीलया हाताळताना पाहणे हा एक अनुभवच.

नर्सिंग केलंस का? असं विचारल्यावर हसून म्हणाली एव्हिएशन केलय सर. करोनाकाळात भीतीने असलेले जॉब सोडून घरी बसणारे आपण पाहतो पण अनामिकाने याच काळात नवीन जॉब स्वीकारला तो हि कोविड हॉस्पिटलमध्ये यातच तिची कामाप्रतीभावना कळून येते. ‘माझ्या भावाचा जन्म इथेच झाला’ हे सांगत अनामिका मातृमंदिरसोबतचा आपलेपणाच धागाही अधोरेखित करते.

We Proud of You



# कोरोनाच्या कालावधीत मातृमंदिर संस्थेची भूमिका निर्णायक : आ. शेखर निकम




**मातृमंदिर संस्थेच्या कोवीड समुपदेशन केंद्रासाठी कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये यांच्याकडे धनादेश सुपूर्द करताना आमदार शेखर निकम.**

**देवरूख** : मावशीबाई हळबे यांचा समाजसेवेचा आदर्श जपणाऱ्या मातृमंदिर संस्थेने कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव वाढत असताना महत्त्वाची निर्णायक भूमिका घेतल्याचे गौरवोद्‌गार आमदार शेखर निकम यांनी काढले.

मातृमंदिर संस्थेच्या वतीने पोस्ट कोविड सेंटर समुपदेशनाचे केंद्र स्थापन करून ऑनलाईन लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सुविधेचा शुभारंभ सोमवारी आ. निकम यांच्या हस्ते संपन्न झाला. मातृमंदिरचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये, आत्माराम मेस्त्री, विलास कोळपे, स्मृती राणे, सामाजिक कार्यकर्ते युयुत्सु आर्ते, तहसिलदार सुहास थोरात, अभिनेते सुशांत शेलार, नवनिर्माण नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या नेहा कदम, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एस. एस. सोनावणे आदी मान्यवर या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते.

मातृमंदिर संस्था संचलित ...

... रुपयांचा धनादेश श्री. हेगशेट्ये यांच्याकडे सुपूर्द केला.

कोविड समुपदेशन केंद्राच्या उपक्रम चिपळूण-संगमेश्वर ...

# 'मातृमंदिर'च्या मदतीसाठी प्रयत्न सुरु : निकम




**देवरुख : मातृमंदिरमधील कार्यक्रमात आमदार शेखर निकम, तहसीलदार सुहास थोरात, मातृमंदिरचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये.**

वार्ताहर
संगमेश्वर

कोविड रुग्णांसाठी मातृमंदिरचे कोविड सेंटर वरदान ठरत आहे. या सेंटरला वेगवेगळया ठिकाणाहून मदत आणण्यासाठी प्रयत्न सुरु आहे. आमदार निधीतून ५० लाख रुपये संगमेश्वर तालुक्याला देण्याचा प्रयत्न केला. त्याद्वारे आरोग्य यंत्रणेला साहित्य पुरविण्यात येत आहे असे प्रतिपादन आमदार शेखर निकम यांनी केले.

देवरुख येथील मातृमंदिर कोविड सेंटरच्या पोस्ट कोविड केअर समुपदेशन केंद्र आणि ऑनलाईन व्हॅक्सिंन रजिस्ट्रेशन उद्‌घाटन समारंभाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मातृमंदिरचे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये, तहसिलदार सुहास थोरात, सिनेकलाकार सुशांत शेलार, नवनिर्माण नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्या नेहा कदम,सामाजिक कार्यकर्ते युयुत्सू आर्ते, आत्माराम मेस्त्री, स्मृती राणे आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन युयुत्सू आर्ते आणि आभार आत्माराम मेस्त्री यांनी मानले.

**आमदार निकमांकडून लाखाची मदत**

आमदार शेखर निकम यांनी देवरुख मातृमंदिरच्या कोविड सेंटरसाठी चिपळूण तालुक्यातील उद्योजक आणि संस्थांच्या माध्यमातून १ लाख २६हजार रुपयांची मदत केली. यामध्ये सह्याद्री शिक्षण संस्था सेवकांची सहकारी पतसंस्था मर्यादित सावर्डे, समिर चव्हाण, २५हजार, महेश घाग चिपळूण १५हजार अभिषेक सुर्वे ११ हजार रुपये १ लाख २६ हजारच्या मदतीचा समावेश आहे.

सकाळ रत्नागिरी TODAY
रत्नागिरी, शनि...
SakalNews @SakalMediaNews www.esakal.com Call Centre : 9225...

# मातृमंदिरकडून मोफत जेवण, सवलतीत औषधोपचार

## अभिजित हेगशेट्ये यांची माहिती; ३० बेडचे कोविड सेंटर, आर्थिक दुर्बल घटकांसाठी ५ बेड राखीव

**सकाळ वृत्तसेवा**

साडवली, ता. ७ : कोकण आणि संगमेश्वर तालुक्यात कोरोनाचा प्रादुर्भाव प्रचंड वेगाने वाढत आहे. रुग्णांना हॉस्पिटलमध्ये बेड मिळत नाहीत. अशा परिस्थितीत देवरूख येथील मातृमंदिर संस्थेने कोविड केअर सेंटर सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. संस्थेने येथील कोविड रुग्णांना संस्थेमार्फत मोफत जेवण सुरू केले असून आर्थिक दुर्बल घटकांसाठी ५ बेड राखीव ठेवले आहेत. गरीब रुग्णांसाठी सवलतीच्या दरात औषधोपचार होतील, असे कार्याध्यक्ष अभिजित हेगशेट्ये यांनी सांगितले.

शिमगोत्सव काळात कोरोनाचा प्रादुर्भाव प्रचंड वेगाने फैलावला. काही घरे, वाड्याच कोरोनाग्रस्त झाल्या. वेळीच ऑक्सिजन आणि उपचार न

**» विधायक**

मिळाल्याने अनेक मान्यवर आणि तरुणांचे निधन झाले. साऱ्या आरोग्य यंत्रणाच जणू कोसळून पडल्याच्या परिस्थितीत या संस्थेने कोविड सेंटर सुरू करण्याचा धाडसी निर्णय घेतला. मातृमंदिरचे देवरूख येथे हॉस्पिटलजवळच गोकुळ बालगृह आहे. कोविड सेंटर सुरू करण्याबाबत अडचणी होत्या; मात्र सर्वसामान्य जनतेची गरज लक्षात घेता मावशी हळबे यांनी व्रतस्थ वृत्तीने सामाजिक कार्यासाठी सुरू केलेल्या संस्थेचे हे कर्तव्य असल्याच्या भावनेतून संचालक मंडळाने हा निर्णय घेतला.

डॉ. परमेश्वर गोंड यांच्या एसएमएस हॉस्पिटलच्या सहकार्याने हे कोविड सेंटर कार्यान्वित केले आहे. मातृमंदिर हॉस्पिटलने यासाठी आवश्यक तज्ञ डॉक्टर, भूलतज्ज्ञ, नर्सेस यांची टीम उभारली आहे. एकूण ३० बेडची उपलब्धता केली असून अधिक १५-२० बेड वाढवावे लागल्यास त्याची उभारणी करण्यासाठी संस्था प्रयत्नशील आहे. हॉस्पिटलमध्ये बेड मिळाला नाही म्हणून येथील एकही रुग्ण आरोग्य सुविधेपासून वंचित राहता कामा नये, या उद्देशाने संस्था कार्यरत आहे.

कोविड पेशंटकडून लाखो रुपयांची बिले घेत त्यांची लूटमार होत असल्याच्या घटना रोज सोशल मीडियावर वाचावयास मिळतात. मातृमंदिर रुग्णालयात हे घडणार नाही याची खबरदारी घेण्यात आली आहे. रुग्णांकडून शासनाने नेमून दिलेल्या दराप्रमाणे बिल आकारणी होणार आहे. गरीब रुग्णांसाठी संस्थेने स्वखर्चाने ५ बेड राखून ठेवले आहेत. तेथे रुग्णाला पन्नास टक्के सवलतीच्या दरात उपचार मिळतील.

**आर्थिक सहकार्याची गरज**

देवरूखसारख्या ग्रामीण भागात मातृमंदिरच्या या कोविड सेंटरने फार मोठा आधार दिला आहे. या सेवा सुविधा उपलब्ध करण्यासाठी आर्थिक सहकार्याची गरज आहे. संस्थेच्या या आवाहनाला प्रतिसाद चांगला मिळत आहे. मातृमंदिर संस्थेचे कोविड बुलेटिन संस्थेच्या वेबसाइटवर रोज अपडेट होणार आहे.

**१९ रुग्णांवर उपचार**

कोविड रुग्णाला जेवणाचा डबा पाठवण्यासाठीही नातेवाईक संसर्ग होईल म्हणून घाबरतात. याचा विचार करून या सर्व रुग्णांची जेवणाची मोफत सुविधा मातृमंदिर संस्थेने केली आहे. आज १९ रुग्ण येथे उपचार घेत आहेत. गेल्या आठवड्यात १०-१२ रुग्ण बरे होऊन घरी परतले आहेत.

# कोविड समुपदेशन केंद्र कौतुकास्पद

## आमदार निकम; सव्वा लाखाची मदत मिळवून दिली, उपक्रम पथदर्शी



# Matrumandir Covid Care Center



जमनालाल बजाज पुरस्काराने सन्मानित

## मातृमंदिर देवरुख

स्थापना १९५४

### मातृमंदिर कोविड केअर सेंटर – मदतीचे आवाहन

**देवरुख परिसरातील ५० पेक्षा अधिक गावांना कोविड आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी वैद्यकिय साधनांची गरज आहे**

* बेड/आयसीयू बेड – २०
* मॉनिटर – ६
* ऑक्सीजन कॉन्सेंट्रेटर
* औषधे
* बायपॅप मशीनस्
* रुग्ण भोजन व्यवस्था/सामग्री
* ऑक्सीमीटर

**आपण आर्थिक स्वरूपातील मदतीसह वस्तूंची मदत संस्थेला करावी. आपली मदत मोलाची ठरणार आहे. आर्थिक मदतीला ८०जी अंतर्गत आयकरात सुट मिळेल.**

### रुग्णांना मोफत जेवण आणि आरोग्य सुविधा

**आपली आर्थिक मदत आमच्यापर्यंत पोहचण्यासाठी बँक डिटेल्स्**

### अपना सहकारी बँक लि.

**शाखा – देवरुख**

**बचत खाते क्र. – 029011100004197**

**IFSC - ASBL0000029**



संपर्क

अभिजित हेगशेटये (कार्याध्यक्ष)

आत्माराम मेस्त्री (कार्यवाह)

मातृमंदिर, देवरुख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी

www.matrumandirdevrukh.org

Phone : 94220 52314 / 94224 30809